# गृहकर्जाची मागणी वाढतेय!

## रेरा, क्रेडिट ब्युरोमुळे गृहनिर्माण क्षेत्रात पारदर्शकता



**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ११ : झपाट्याने होणारे शहरीकरण, परवडणाऱ्या घरांची योजना, रेरा नियमावलीची अंमलबजावणी आणि क्रेडिट ब्युरोमुळे गृहनिर्माण क्षेत्रात पारदर्शकता आली आहे. त्यामुळे वर्षभरापासून असलेले या क्षेत्रातील मंदीचे मळभ दूर झाले आहे. आता गृहकर्जाची मागणी वाढत असल्याचे मत 'एडलवाईज रिटेल फायनान्स'चे मुख्य कार्यकारी अनिल कोठुरी यांनी व्यक्त केले आहे. मार्चअखेर 'एडलवाईज'ने १० हजार कोटींचे गृह आणि व्यावसायिक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गृहकर्ज वितरणात दरवर्षी सरासरी २० टक्के वाढ होत आहे. बँकांबरोबरच खासगी वित्त पुरवठादार कंपन्यांची कामगिरी सुधारली आहे. २०१२ पासून गृहकर्जाच्या एकूण वितरणापैकी ४५ टक्के हिस्सा खासगी कंपन्यांनी व्यापला आहे. २०१० मध्ये १० लाख गृहकर्जांचे वितरण करण्यात आले होते. २०१६ मध्ये १८ लाख गृहकर्जे देण्यात आल्याचे कोठुरी यांनी सांगितले. गृहनिर्माण क्षेत्रासाठी आणि वित्त पुरवठादार कंपन्यांसाठी वाढते शहरीकरण नव्या व्यावसायिक संधी घेऊन आल्याचे ते म्हणाले. पाच ते सात वर्षांत भारतात नवी शहरे उभी राहिली आहेत. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत गृहकर्जाची सरासरी रक्कम एक कोटी ५० लाखांहून दोन कोटी ९० लाखांपर्यंत वाढली आहे. यातील ८५ टक्के कर्जे २५ लाखांच्या दरम्यान असल्याची माहिती त्यांनी दिली.

एडलवाईजने चालू आर्थिक वर्षात तब्बल सहा हजार कोटींचे गृहकर्ज वितरित केले आहे. त्याचबरोबर लघू आणि मध्यम उद्योगांसाठी दोन हजार कोटींचे व्यावसायिक कर्ज वितरित केले आहे. गेल्या आर्थिक वर्षात 'एडलवाईज'ने साडेपाच हजार कोटींची कर्जे वितरित केल्याचे कोठुरी यांनी सांगितले. नव्याने विकसित होणाऱ्या शहरांमधून गृहकर्जांना मागणी आहे. ज्यात राजकोट, भटिंडा, विजयवाडा, मुंबई महानगर क्षेत्र, पुणे, सोलापूर या शहरांमधील ग्राहकांना 'एडलवाईज' सेवा देत आहे. मार्च २०१८ अखेर कंपनी १० हजार कोटींचे कर्ज वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करेल, असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार १०० स्मार्टसिटी आणि २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरांची महत्त्वाकांक्षी योजना राबवत आहे. त्यामुळे नजीकच्या काळात गृहकर्जांची मागणी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशभरात 'एडलवाईज'च्या १०२ शाखा असून आणखी २० शाखा नजीकच्या काळात सुरू होतील, असे त्यांनी सांगितले.